## दिनेश
### बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587



दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे






वर्ष ५ । अंक २५४ । बुधवार ८ जुलै २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322


# देहरे येथे भाजीविक्रेत्या महिलेला लुटणारे दोघे सराईत अटकेत

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** देहरे गावातील वडार स्मशानभूमीजवळ एका महिला भाजी विक्रेतीला लाथ मारून तिचे सोन्याचे दागिने, रोकड आणि मोबाईल जबरदस्तीने लुटणाऱ्या दोन अट्टल आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेने शिताफीने अटक केली आहे. राहुल विजय निकम (वय २५, रा. वडगाव गुप्ता, अहिल्यानगर) आणि अरुण रावसाहेब बर्डे (वय २१, रा. विळद, अहिल्यानगर) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

दिनांक ४ जुलै रोजी रात्री ८ वाजेच्या सुमारास फिर्यादी महिला भाजीपाला विक्री करून उरलेला माल घेऊन मोपेड दुचाकीवर घराकडे जात होती. देहरे गावातील वडार स्मशानभूमी परिसरात दोन अज्ञात इसमांनी त्यांच्या स्कूटीला लाथ मारून पाडले. त्यानंतर महिले जवळील सोन्याचे दागिने, रोख रक्कम आणि मोबाईल फोन बळजबरीने चोरून नेले. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३०९(४) आणि ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तपास पथकाने तांत्रिक कौशल्य आणि गुप्त बातमीदाराच्या मदतीने माहिती काढली असता, सदर गुन्हा राहुल निकम व त्याच्या साथीदाराने केल्याची आणि ते निंबळक रेल्वे फाटक धरमपुरी मंदिराजवळ असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. पथकाने तातडीने सापळा रचून दोन्ही संशयितांना ताब्यात घेतले. पोलिसी खाक्या ■ पान ४ वर



### पथकात यांचा सहभाग

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे तसेच तपास पथकातील उपनिरीक्षक अनंत सालगुडे, पोलीस अंमलदार विष्णू भागवत, दीपक घाटकर, शाहिद शेख, गणेश धोत्रे, फुरकान शेख, प्रशांत राठोड आणि महिला पोलीस अंमलदार ज्योती शिंदे यांनी केली.

### दिल्ली गेटचा शापित रस्ता दुभाजक

# मध्यरात्री पुन्हा अपघात; आज पर्यंतच्या अपघाताची संख्या बारावर

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** दिल्ली गेट ते नेप्ती नाका रस्त्यावर ठेकेदाराने उभारलेल्या रस्ता दुभाजकाला शाप लागलेला आहे असेच म्हणावे लागेल. या दुभाजकाला धडकून मंगळवारच्या मध्यरात्री पुन्हा एक मोठा अपघात घडला.

अहिल्यानगर शहरातील नामांकित नाथ कृपा ट्रॅव्हल्स ची सातारा जाणारी लक्झरी बस मध्यरात्रीच्या सुमारास रिमझिम पाऊस चालू असताना रस्त्याचा अंदाज न आल्याने तसेच रस्ता दुभाजक दिसून न आल्याने थेट दुभाजकावर चढली. या अपघातामध्ये बसचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. या रस्त्यावर दुभाजक उभारल्यापासून आज पर्यंत दहा ते बारा ■ पान ४ वर




दिल्ली गेट ते नेप्ती नाका हा रस्ता मुळातच अरुंद आहे. असे असताना सुद्धा ठेकेदाराने या रस्त्यावर दुभाजक टाकण्याचा घाट घातला. या रस्त्याच्या दोन्ही बाजूने अनेक ठिकाणी इमारतींचे अतिक्रमण पुढे आलेले आहे. रस्त्याच्या बाजूला वाहन थांबले तर पाठीमागून येणाऱ्या वाहनांना पुढे जाण्यासाठी रस्ता अरुंद असतो त्यामुळेच वाहन दुभाजकावर धडकते आणि अपघात होतो. या दुभाजकांपैकी अर्ध्या रस्त्यावरील दुभाजक आमदार संग्राम जगताप यांच्या आदेशानुसार काढून टाकण्यात आलेला आहे, मात्र उर्वरित दुभाजक सुद्धा काढून टाकावा अशी मागणी उपमहापौर धनंजय जाधव यांच्याकडे दिल्ली गेट परिसरातील नागरिकांनी यापूर्वीच केली होती. मात्र हा दुभाजक काढण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाची परवानगी घ्यावी लागेल असे सांगण्यात आले होते. मंगळवारी मध्यरात्री झालेल्या पुन्हा एका अपघातामुळे दुभाजक काढण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

# अहिल्यानगरातील हॉटेल सगम आणि सत्कारचा परवाना निलंबित

### अस्वच्छतेचा ठपका, अन्न औषध प्रशासनाची कारवाई

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर शहरातील हॉटेलांचा अन्न व्यवसाय परवाना अन्न व औषध प्रशासनाने निलंबित केला आहे. तपासणीदरम्यान दोन्ही हॉटेलमध्ये अस्वच्छता आढळून आल्याने अन्न सुरक्षा नियमांचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आले. जनहित आणि सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने ही कारवाई करण्यात आल्याने शहरातील हॉटेल व्यावसायिकांमध्ये खळबळ उडाली आहे.

अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या संकल्पनेतून राज्यभर 'सुरक्षित अन्न, निरोगी महाराष्ट्र' ही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत हॉटेल, उपहारगृहे, खाद्यपदार्थ विक्रीची आस्थापने तसेच इतर अन्न व्यवसायांची नियमित तपासणी सुरू आहे. त्याच अनुषंगाने अहिल्यानगर अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकार्यांनी शहरातील स्वस्तिक चौक येथील हॉटेल सगम आणि माळीवाडा परिसरातील हॉटेल सत्कार येथे अचानक तपासणी केली. तपासणीदरम्यान दोन्ही हॉटेलमध्ये स्वच्छतेच्या नियमांकडे दुर्लक्ष झाल्याचे आढळून आले.

अन्न तयार करण्याची जागा, स्वच्छतेची व्यवस्था तसेच अन्न सुरक्षा मानकांचे पालन समाधानकारक नसल्याचे निरीक्षण नोंदविण्यात आले. त्यामुळे अन्न सुरक्षा व मानके (अन्न व्यवसायांचे परवाना व नोंदणी) नियम, २०११ मधील संबंधित तरतुदींनुसार दोन्ही हॉटेलांचे अन्न व्यवसाय परवाने तात्काळ प्रभावाने निलंबित करण्याचे आदेश अन्न व औषध ■ पान ४ वर



### डोंगरावर ढगांची नुसतीच गर्दी

गेल्या ४ दिवसांपासून सर्वत्र पाऊस सुरू असला तरी नगर तालुक्यात मात्र रिमझिम पाऊस पडत आहे. डोंगर रांगेत असणाऱ्या गोरक्षनाथ गड, मिरावली पहाड, चांदबीवी महाल अशा डोंगरावर ढगांची गर्दी होत आहे. जणू काही डोंगरावर ढगांची चादर पसरली आहे असे दृश्य दिसत आहे. (छाया – विजय मते)

# कीर्तनवाडी दरोडा प्रकरणातील दोन आरोपी एलसीबीकडून जेरबंद

### बारा गुन्हे उघडकीस । मागील महिन्यात घडली होती घटना । दागिने विकत घेणारा सराफही निष्पन्न

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** पाथर्डी तालुक्यातील कीर्तनवाडी येथे १० जून रोजी रात्रीच्या सुमारास घरात घुसून मारहाण करत लाखोंचा मुद्देमाल लुटणाऱ्या सराईत गुन्हेगारांच्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला आहे. याप्रकरणी पोलिसांनी दोन मुख्य आरोपींना



शिताफीने अटक केली असून, त्यांच्याकडून जबरी चोरी आणि घरफोडीचे तब्बल १२ गुन्हे उघडकीस आले आहेत.

दिनांक १० जून रोजी मध्यरात्री दीड वाजता कीर्तनवाडी येथील फिर्यादी रावसाहेब बाजीराव ■ पान ४ वर

# राज्यातील प्राथमिक आणि माध्यमिक शाळा सकाळी भरणार

### शिक्षण विभागाचा आदेश

**मुंबई । वृत्तसंस्था –** राज्यात मतदारयाद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) मोहिमेत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) म्हणून नियुक्त शिक्षकांना पुरेसा वेळ मिळण्यासाठी आता शाळांच्या वेळेत बदल करण्यात येणार आहे. त्यानुसार ३० जुलैपर्यंत राज्यातील शाळा सकाळच्या सत्रात भरवण्याचे आदेश माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाने दिले आहेत.

मात्र, या आदेशामुळे निर्माण होणाऱ्या अडचणींबाबत शिक्षक संघटनांकडून प्रश्न उपस्थित करण्यात येत आहेत.प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी या बाबत परिपत्रकाद्वारे सूचना दिल्या आहेत.

काही दिवसांपूर्वी राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने शिक्षण विभागाच्या प्रधान सचिवांना बीएलओ शिक्षकांबाबत पत्र दिले होते. त्यात ज्या शिक्षकांना बीएलओ म्हणून नियुक्त करण्यात आले आहे, त्यांच्या शिकवणीच्या तासिका शक्यतो कमीत कमी, सलग ठेवाव्यात, बीएलओ म्हणून नियुक्ती ■ पान ४ वर

# दरेगावातील ३० वर्षीय शेतकऱ्याची गळफास घेऊन आत्महत्या

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण–** तालुक्यातील दरेगाव येथील दत्ता बंडू गिरी (वय ३०) यांनी आपल्या राहत्या घराच्या पत्र्याच्या शेडमध्ये गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.



घटनेची माहिती मिळताच संबंधित यंत्रणांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. दरम्यान, आत्महत्येचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

# नगरकरांना भावली...बबन्या, माय व जानरावची धमाल

### वऱ्हाडचा बहुपात्री प्रयोग रंगला, हशा व टाळ्यांची उत्स्फूर्त दाद



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** वर्हाडकार प्रा. लक्ष्मण देशपांडे यांनी अजरामर केलेली बबन्या, माय, जानराव, काशिनाथ, मंदी, ज्युडी ही पात्रे प्रत्यक्षात अवतरली आणि त्यांनी नगरच्या माऊली सभागृहात धमाल उडवून दिली...नगरकरांकडून टाळ्या व हशांची दाद मिळवून गेली. मा. आ. स्व. अरुणकाका जगताप कलाकार कट्टा उपक्रमाचा पहिला वर्धापनदिन संस्मरणीय करून गेली. १६ महिलांनी उभी केलेली ५२ पात्रे नगरकरांना एव्हढी भावली की, अनेकांना या कलावंतांसमवेत फोटो घेण्याचा व सेल्फी काढण्याचा मोह आवरला नाही.काहींनी तर चक्क या कलावंतांच्या सह्याही घेतल्या...

नगरमधील जागरूक नागरिक मंचाचे अध्यक्ष सुहासभाई मुळे यांच्या पुढाकाराने उदयोन्मुख कलावंतांना कलाविष्काराची संधी देण्यासाठी वाडियापार्क क्रीडा संकुल आवारात लोकमान्य टिळक पुतळ्याजवळ आ. संग्राम जगताप यांच्या पाठबळाने गेल्यावर्षी मा. आ. स्व. अरुणकाका जगताप कलाकार कट्टा उपक्रम सुरू केला गेला. या कट्ट्याच्या पहिल्या वर्धापनदिनानिमित्त माऊली सभागृहात "वर्हाड निघालंय लंडनला" या प्रसिद्ध एकपात्री नाटकाच्या बहुपात्री रुपांतरणाचा अभीनव प्रयोग आयोजित करण्यात आला होता. पुण्यातील शिवसागर रेसिडेन्सी या वसाहतीतील हौशी महिलांनी हा बहुपात्री प्रयोग दमदारपणे सादर केला. ज्यांनी प्रा. देशपांडे यांचे एकपात्री वर्हाड पाहिले आहे, त्यांना त्याची बहुपात्री रचना जाम आवडली. आ. संग्राम जगताप यांच्यासह नगरमधील प्रसिद्ध ज्वेलर्स एस. जी. कायगांवकर फर्मचे प्रमुख सुभाष कायगावकर, जीवनज्योत मेडिकल फाउंडेशनचे प्रमुख डॉ.रियाझ, आकाश प्रिसिजन उद्योग समूहाचे प्रमुख आकाश श्रीकृष्ण जोशी, कोणार्क उद्योग ■ पान ४ वर

# पर्यावरणाच्या रक्षणासाठी वृक्षारोपण व संवर्धन ही काळाची गरज – उपमहापौर ॲड. धनंजय जाधव

### । नामदार राधाकृष्ण विखे पाटील ग्रीन सिटी मोहिमेंतर्गत सारडा कॉलेजमध्ये वृक्षारोपण उत्साहात संपन्न । अहिल्यानगर महानगरपालिका व साई द्वारका सेवा ट्रस्टचा संयुक्त उपक्रम

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** पर्यावरणाचा वाढता ऱ्हास, बदलते ऋतुमान आणि वाढते प्रदूषण यामुळे मानवी आरोग्यासमोर गंभीर आव्हाने निर्माण होत आहेत. कोणत्याही ऋतूमध्ये ऊन, वारा, पाऊस आणि थंडीचा अनियमित अनुभव येत असल्याने पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धन हा काळाचा अत्यावश्यक मंत्र बनला आहे. संत तुकाराम महाराजांनी शेकडो वर्षांपूर्वी "वृक्षवल्ली आम्हा सोयरे'' या ओळींतून वृक्षांचे महत्त्व समाजाला पटवून दिले होते. त्याच विचारांचा वारसा पुढे नेत नामदार राधाकृष्ण विखे पाटील ग्रीन सिटी मोहिमेच्या माध्यमातून संपूर्ण शहरात वृक्षारोपणाची लोकचळवळ उभी राहत असून नगरकर त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद देत आहेत. पावसाळा हा वृक्षारोपणासाठी सर्वोत्तम काळ



असून प्रत्येक नागरिकाने जास्तीत जास्त झाडे लावून त्यांचे संगोपन करण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. शहराच्या मध्यवर्ती भागात सारडा कॉलेजने ऑक्सिजन पार्क उभारून समाजासमोर आदर्श निर्माण केला आहे, असे प्रतिपादन अहिल्यानगर महानगरपालिकेचे उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी केले.

अहिल्यानगर महानगरपालिका आणि साई द्वारका सेवा ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने सारडा कॉलेज येथे नामदार राधाकृष्ण विखे पाटील ग्रीन सिटी मोहिमेंतर्गत वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

या प्रसंगी हिंदसेवा मंडळाचे मानद सचिव संजय जोशी, कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी, कनिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन मधुसूदन सारडा, ज्येष्ठ मार्गदर्शक ब्रिजलाल सारडा, अजित बोरा, प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित, उपप्राचार्य मिलिंद देशपांडे, गिरीश पाखरे, प्रा. राजेंद्र देशमुख, प्रा. माधुरी दीक्षित, ग्रीन आर्मीचे सदस्य प्रा. हर्षल आगळे, प्रा. प्रसाद बेडेकर तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी हिंदसेवा मंडळाचे मानद सचिव संजय जोशी म्हणाले ■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### सरोज आल्हाट यांना राज्यस्तरीय महाराष्ट्र भूषण पुरस्कार २०२६ प्रदान



अहिल्यानगर - येथील कवयित्री, सामाजिक कार्यकर्त्या व मुक्त पत्रकार सरोज आल्हाट यांना यशवंत सेना व जय मल्हार शैक्षणिक व बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने राज्यस्तरीय महाराष्ट्र भूषण पुरस्कार २०२६ प्रदान करण्यात आला. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती उत्सवानिमित्त शहरात झालेल्या धनगर समाजाच्या मेळाव्यात आल्हाट यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.या कार्यक्रमास आमदार संग्राम जगताप यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रसंगी प्राचार्य तुळशिराम भोजने, यशवंत सेनेचे शहराध्यक्ष कांतीलाल जाडकर, सरचिटणीस अजय जाडकर, मच्छिंद्र बिडगर, शर्मिला नलावडे, सामाजिक कार्यकर्ते पै. नाना डोंगरे, पुणे महापालिकेच्या सहाय्यक आयुक्त रेश्मा पुणेकर आदी उपस्थित होते.सरोज आल्हाट या केवळ साहित्यिक, कवयित्री म्हणूनच नव्हे, तर सामाजिक प्रश्नांवर लेखन व जनजागृती करणाऱ्या सक्रिय कार्यकर्त्या म्हणूनही ओळखल्या जातात. विविध सामाजिक उपक्रमांमध्ये त्यांचा सहभाग उल्लेखनीय असून त्यांनी महिलांविषयक, शिक्षण आणि समाजजागृती विषयांवर प्रभावी काम करत आहेत. या कार्याची दखल घेऊन त्यांना सदर पुरस्कार प्रदान करण्यात आला. यापूर्वीही त्यांना आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य व जिल्हास्तरीय अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. सदर पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

### ९ जुलै रोजी आम्हाला शिकवू द्यासाठी राज्यव्यापी शाळा बंद आंदोलन

अहिल्यानगर- राज्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारी संघटनांच्या समन्वय समितीच्या वतीने ''आम्हाला शिकवू द्या'' या प्रमुख मागणीसाठी गुरुवार, दि. ९ जुलै २०२६ रोजी राज्यव्यापी शाळा बंद आंदोलन पुकारण्यात आले आहे. या आंदोलनाला शिक्षक भारती संघटनेने सक्रिय पाठिंबा जाहीर केला असून राज्यातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे. अशी माहिती शिक्षक नेते तथा शिक्षक भारतीचे राज्य सचिव सुनील गाडगे यांनी दिली. शिक्षकांवरील वाढत्या अशैक्षणिक जबाबदाऱ्यांमुळे अध्यापनावर परिणाम होत असून, शिक्षकांना त्यांच्या मूळ अध्यापन कार्यासाठी पुरेसा वेळ मिळावा, शिक्षण व्यवस्थेतील अन्यायकारक निर्णय मागे घेण्यात यावेत आणि प्रलंबित प्रश्न तातडीने निकाली काढावेत, या प्रमुख उद्देशाने हे आंदोलन आयोजित करण्यात आले आहे. आंदोलनाच्या प्रमुख मागण्यांमध्ये सेवाज्येष्ठता व पदोन्नतीसाठी टीईटी परीक्षा सक्ती रद्द करणे, आरटीई कायदा लागू होण्यापूर्वी नियुक्त झालेल्या शिक्षकांना टीईटी परीक्षेतून वगळणे, बीएलओ व एसआयआरसारख्या अशैक्षणिक कामांतून शिक्षकांची मुक्तता करणे, पेन्शनविषयक प्रश्न मार्गी लावणे, संच मान्यतेबाबतचे प्रश्न सोडविणे, कनिष्ठ महाविद्यालयांतील अन्यायकारक संच मान्यतेचा पुनर्विचार करणे तसेच अंशतः अनुदानित शाळांना टप्पा अनुदानवाढ देणे आदी मागण्यांचा समावेश आहे. याबाबत शिक्षक भारती संघटनेचे राज्य सचिव तसेच शिक्षक नेते सुनील गाडगे म्हणाले, ''शिक्षक हा समाज घडविणारा महत्त्वाचा घटक आहे. मात्र, आज शिक्षकांना अध्यापनापेक्षा विविध अशैक्षणिक कामांमध्ये गुंतविले जात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणावर परिणाम होत आहे. आम्हाला शिकवू द्या ही केवळ घोषणा नसून विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठीचा आणि शिक्षण व्यवस्थेच्या गुणवत्तेसाठीचा लढा आहे. त्यामुळे प्रत्येक शिक्षकाने आपल्या न्याय्य हक्कांसाठी एकजुटीने उभे राहणे ही काळाची गरज आहे.'' ते पुढे म्हणाले, ''टीईटी सक्ती, बीएलओची कामे, संच मान्यता, पेन्शन, अंशतः अनुदानित शाळांचे प्रश्न यांसह अनेक प्रलंबित मागण्या शासनाकडे वारंवार मांडूनही त्यावर अपेक्षित निर्णय होत नाही. त्यामुळे लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याशिवाय पर्याय उरलेला नाही. दि. ९ जुलै रोजी होणाऱ्या राज्यव्यापी शाळा बंद आंदोलनात सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि शिक्षणप्रेमींनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. शिक्षकांची एकजूटच आपल्या न्याय्य मागण्यांना बळ देईल आणि शासनाला सकारात्मक निर्णय घेण्यास भाग पाडेल.

## आषाढी वारीतील आरोग्य सेवा शिबिरासाठी स्वयंसेवकांना टी-शर्ट, टोपींचे वितरण




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पंढरपूर आषाढी वारी २०२६ निमित्त मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, जिल्हा अहिल्यानगर यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या आरोग्य सेवा शिबिर व चरणसेवा उपक्रमासाठी कार्यरत स्वयंसेवक डॉक्टर व रुग्णमित्रांना टी-शर्ट व टोपींचे वितरण निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते यांच्या हस्ते करण्यात आले. या साहित्याचे वितरण संबंधित रुग्णालय व महाविद्यालयांच्या प्रतिनिधींना करण्यात आले.

आषाढी वारीदरम्यान वारकऱ्यांना आरोग्य सेवा, प्रथमोपचार व चरणसेवा प्रभावीपणे उपलब्ध करून देण्यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षामार्फत हा उपक्रम राबविण्यात येत आहे. स्वयंसेवकांची ओळख सहज व्हावी तसेच सेवाकार्य अधिक सुसूत्रपणे पार पडावे, या उद्देशाने टी-शर्ट व टोपींचे वितरण करण्यात आले.

यावेळी तहसीलदार श्रीमती शोभा पुजारी, माहिती अधिकारी अमोल महाजन, सहाय्यक महसूल अधिकारी स्वप्नील फलटणे, महसूल सहाय्यक साईनाथ उप्पोड, संतोष साळवे, डॉ. विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटल, विळदघाट येथील श्रीमती काळे, डॉ. रेहान शाह तसेच मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, अहिल्यानगरचे स्वप्नील कच्छवे आदी उपस्थित होते.

## श्रीकांत पेमराज गुगळे हायस्कूलच्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत ०६ विद्यार्थी जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीत

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** शिशु संगोपन संस्था संचालित श्रीकांत पेमराज गुगळे हायस्कूल संलग्न महेंद्र मधुकर वारे कनिष्ठ महाविद्यालयातील पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत ०६ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र झाले असल्याची माहिती मुख्याध्यापक दत्तात्रय कसबे यांनी दिली.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ८ वी) फेब्रु.२०२६ मध्ये विद्यालयातील २० विद्यार्थी प्रविष्ट झाले होते त्यामध्ये एकूण १७ विद्यार्थी पात्र झाले असून जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीत *०६ विद्यार्थी शिष्यवृत्ती पात्र* झाले आहेत. त्यांना रुपये *७५००/- प्रति वर्ष शिष्यवृत्ती* मंजूर झाली आहे. विद्यालयाचा एकूण *निकाल ८५ टक्के* लागला असून *अहिल्यानगर महानगरपालिका क्षेत्रात शाळानिहाय यादीमध्ये शाळा द्वितीय क्रमांकावर* आहे.

शिष्यवृत्ती धारक विद्यार्थी* खालीलप्रमाणे

मंडलिक ओम श्रीराम २६४ ,महाजन सुयोग नारायण २४२ , गाडे सुयश गणेश २३६

कोल्हे श्रेयस भारत २३६,५. कुलंगे समर्थ संतोष २२८, शिंदे प्रत्युष प्रकाश २२६. सर्व गुणवंत विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक यांचे शिशु संगोपन संस्थेचे चेअरमन दिलीप गुंदेचा , व्हा. चेअरमन दशरथ खोसे , सचिव र.धों. कासवा , सहसेसचिव राजेश झालानी , खजिनदार ॲड विजय मनोत तसेच सर्व विश्वस्त, संस्था पदाधिकारी, मुख्याध्यापक दत्तात्रय .कसबे व सर्व सेवकवृंद, पालक यांनी अभिनंदन केले.

## साधे राहणीमान, उच्च विचार : लोकमान्य आणि सर्वसमावेशक नेतृत्व सुरेंद्र भाऊ थोरात

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**






**अहिल्यानगर–** शांत, संयमी आणि संघर्षशील... ही तीन विशेषणे ज्यांच्या व्यक्तिमत्त्वाला तंतोतंत लागू पडतात, ते नेतृत्व म्हणजेच अहिल्यानगरचे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) चे जिल्हाध्यक्ष सुरेंद्र भाऊ थोरात. आजच्या झगमगाटाच्या आणि दिखाव्याच्या राजकीय दुनियेत, कुठलाही बडेजाव किंवा लवाजमा न बाळगता केवळ आणि केवळ समाजकारणाचा ध्यास घेतलेला एक लोकनेता म्हणून सुरेंद्र भाऊंकडे पाहिले जाते.

**साधे राहणीमान, पारदर्शक स्वभाव**

सुरेंद्र भाऊ थोरात यांच्या व्यक्तिमत्त्वाची सर्वात मोठी वैशिष्ट्ये म्हणजे त्यांचे साधे राहणीमान आणि सरळ वागणं. त्यांच्या बोलण्यात आणि वागण्यात कुठेही कृत्रिमता नाही. जो मनामध्ये आहे, तोच त्यांच्या शब्दांमध्ये असतो. हा पारदर्शक स्वभावच त्यांना इतर नेत्यांपेक्षा वेगळा ठरवतो. सामान्य जनतेला किंवा कार्यकर्त्याला त्यांच्याशी संवाद साधताना कधीही दडपण येत नाही, तर उलट हक्काचा माणूस भेटल्याची भावना निर्माण होते.

**लवाजमा विरहित, केवळ कर्तृत्वावर भर**

आजकाल किरकोळ पदावर असलेल्या व्यक्तीच्या मागे-पुढे कार्यकर्त्यांची फौज आणि गाड्यांचा ताफा पाहायला मिळतो. मात्र, सुरेंद्र भाऊ या सर्व गोष्टींपासून खूप दूर आहेत. कुठल्याही लवाजम्याची अपेक्षा न करता, ते स्वतः जमिनीवर उतरून काम करण्यावर विश्वास ठेवतात. समाजातील शोषित, वंचित आणि गरजू घटकांसाठी लढताना त्यांना कोणत्याही दिखाव्याची गरज भासत नाही. त्यांचे कार्य आणि त्यांची समाजाप्रती असलेली निष्ठा हाच त्यांचा खरा लवाजमा आहे.

**शांतता आणि संयमाने प्रश्न सोडवणारे नेतृत्व**

''आवाज उठवून वाद निर्माण करणे सोपे असते, पण शांततेने आणि संयमाने प्रश्न कायमचा मिटवणे कठीण असते.'' सुरेंद्र भाऊंचे नेतृत्व नेमके याच सूत्रावर चालते. समाजकारण असो वा राजकारण, कितीही बिकट परिस्थिती समोर आली तरी भाऊ आपला संयम कधीही सोडत नाहीत. अत्यंत शांत डोक्याने, सुसंवाद साधून आणि दोन्ही बाजू समजून घेऊन ते समाजातील कठीण प्रश्न मिटवतात. त्यांच्या याच मध्यस्थीच्या आणि मिटवामिटवीच्या कौशल्यामुळे अनेक सामाजिक आणि कौटुंबिक वाद मिटले आहेत, ज्यामुळे समाजात सलोखा टिकून राहण्यास मदत झाली आहे.

**समाजासाठी निरंतर संघर्ष**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) चे जिल्हाध्यक्ष म्हणून काम करताना त्यांनी पक्षाची ध्येयधोरणे तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवली आहेत. समाजातील प्रत्येक घटकाला न्याय मिळावा, कोणावरही अन्याय होऊ नये, यासाठी ते सदैव तत्पर असतात. संविधानाचा आदर करत आणि महापुरुषांच्या विचारांचा वारसा जपत, ते अविरतपणे समाजाच्या सेवेत कार्यरत आहेत.

थोडक्यात सांगायचे तर, सुरेंद्र भाऊ थोरात हे केवळ एका पक्षाचे जिल्हाध्यक्ष नाहीत, तर ते अहिल्यानगरमधील जनतेच्या विश्वासाचे प्रतीक आहेत. साधे जगणे आणि समाजासाठी लढणे हाच त्यांच्या जीवनाचा मूळ मंत्र आहे. शांततेने आणि संयमाने समाजासाठी धावून जाणाऱ्या या अजातशत्रू नेत्याला त्यांच्या भावी सामाजिक आणि राजकीय प्रवासासाठी लाख लाख शुभेच्छा!

## अहिल्यानगर जिल्हा वाचनालयाच्या अध्यक्षपदी डॉ. ठाकूर; तांबोळी सहसचिवपदी सर्वानुमते निवड



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर जिल्हा वाचनालय या प्रतिष्ठित संस्थेच्या संचालक मंडळाच्या बैठकीत ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व आयुर्वेद क्षेत्रातील अभ्यासू व्यक्तिमत्त्व डॉ. राजा ठाकूर यांची अध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली. तसेच राहुल तांबोळी यांची सहसचिवपदी सर्वानुमते निवड झाल्याने दोघांवरही विविध स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

डॉ. राजा ठाकूर हे गेली अनेक वर्षे अहिल्यानगर जिल्हा वाचनालयात सहकार्यवाह व संचालक म्हणून कार्यरत असून संस्थेच्या विकासासाठी त्यांनी सातत्याने योगदान दिले आहे. सामाजिक, शैक्षणिक आणि वैचारिक क्षेत्रातील त्यांच्या प्रदीर्घ अनुभवाचा लाभ आता अध्यक्ष म्हणून संस्थेला मिळणार असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

डॉ. ठाकूर यांनी अकोले तालुक्यातील वनवासी कल्याण आश्रमामार्फत दुर्गम भागात सामाजिक सेवेचे उल्लेखनीय कार्य केले आहे. तसेच अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेमध्ये अनेक वर्षे सक्रियपणे कार्यरत राहून युवकांमध्ये राष्ट्रभक्ती, सामाजिक बांधिलकी आणि नेतृत्वगुण विकसित करण्यासाठी योगदान दिले आहे. देशपातळीवरील आयुर्वेद व्यासपीठाच्या उभारणीत त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली असून विविध जबाबदारीच्या पदांवर कार्य करत आयुर्वेद क्षेत्राच्या विकासासाठी मोलाचे योगदान दिले आहे.

## वादळी पावसाच्या पार्श्वभूमीवर महावितरणचे वीज ग्राहकांना सतर्कतेचे आवाहन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**कोपरगाव–** राज्यात सध्या पावसाळ्याचा जोर कायम असून नाशिक तसेच अहिल्यानगर जिल्ह्यात अनेक ठिकाणी अधूनमधून जोरदार पाऊस, वादळी वारे आणि विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तविली आहे. या पार्श्वभूमीवर कोणतीही अनुचित घटना टाळण्यासाठी महावितरणने वीज ग्राहकांना आवश्यक खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे.

कोळपेवाडी, शहाजापूर, सुरेगाव, चासनळी तसेच कोपरगाव परिसरातील सर्व वीज ग्राहकांनी पावसाळ्यात वीज सुरक्षिततेच्या नियमांचे काटेकोर पालन करून स्वतःची आणि कुटुंबीयांची सुरक्षितता जपावी, असे आवाहन महावितरणचे सहाय्यक अभियंता सुशील जगदीश पनाड यांनी केले आहे.

पावसाळ्यात वादळी वाऱ्यामुळे झाडांच्या फांद्या विद्युत वाहिन्यांवर पडणे, वीजतारा तुटणे, खांबांना नुकसान होणे किंवा इतर तांत्रिक बिघाड होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे तुटलेल्या अथवा खाली पडलेल्या वीजवाहिन्यांपासून सुरक्षित अंतर ठेवावे. अशा तारांना स्पर्श करण्याचा किंवा त्याजवळ जाण्याचा प्रयत्न करू नये. कोणतीही धोकादायक परिस्थिती आढळल्यास तात्काळ महावितरणला माहिती द्यावी.

याशिवाय ओल्या हाताने विद्युत स्विच किंवा उपकरणांना स्पर्श करू नये, पाणी साचलेल्या ठिकाणी विजेचा वापर करताना विशेष काळजी घ्यावी, तसेच घरातील विद्युत यंत्रणा सुरक्षित असल्याची खात्री करून घ्यावी. वीज पुरवठ्यात बिघाड झाल्यास स्वतः दुरुस्ती करण्याचा प्रयत्न न करता महावितरणच्या अधिकृत कर्मचाऱ्यांशी संपर्क साधावा. सहाय्यक अभियंता सुशील जगदीश पनाड यांनी नागरिकांना आवाहन करताना सांगितले की, ''पावसाळ्याच्या काळात प्रत्येकाने वीज सुरक्षिततेचे नियम पाळणे अत्यंत गरजेचे आहे. थोडीशी निष्काळजीपणाही मोठ्या दुर्घटनेला कारणीभूत ठरू शकते. त्यामुळे सर्व नागरिकांनी सतर्क राहून महावितरणच्या सूचनांचे पालन करावे.'' पावसाळ्यात सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत नागरिकांनी सतर्क राहावे आणि कोणतीही आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास त्वरित महावितरणशी संपर्क साधावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

## भुदरगड पंचायत समितीचा खा. लंके यांच्या अभिनंदनाचा ठराव

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** किल्ले भुदरगडच्या जतन व संवर्धनासाठी सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे राज्य शासनाकडून सुमारे ५ कोटी ५५ लाख रुपयांचा निधी मंजूर झाल्याबद्दल खासदार नीलेश लंके यांच्या कार्याची पंचायत समिती भुदरगडने दखल घेत त्यांच्या अभिनंदनाचा ठराव सर्वानुमते मंजूर केला आहे.

पंचायत समितीच्या दिनांक १ जून रोजी झालेल्या सभेत अभिनंदनीय ठराव मांडण्यात आला. या ठरावात खासदार नीलेश लंके यांनी भुदरगड किल्ल्याच्या जतन व संवर्धनासाठी संबंधित विभागांकडे सातत्याने पाठपुरावा करून हा विषय शासन स्तरावर प्रभावीपणे मांडल्याची नोंद करण्यात आली आहे. त्यांच्या प्रयत्नांमुळे राज्य शासनाने भुदरगड किल्ल्याच्या संवर्धनासाठी सुमारे ५.५५ कोटी रुपयांच्या निधीस प्रशासकीय मंजुरी दिल्याबद्दल सभागृहाने समाधान व्यक्त केले.

इतिहास व सांस्कृतिक वारसा जतन करण्यासाठी खासदार लंके यांनी केलेले कार्य उल्लेखनीय असून, त्यांच्या प्रयत्नांमुळे राज्यातील ऐतिहासिक वारसा संवर्धनाला नवी दिशा मिळाल्याचे मत ठरावात व्यक्त करण्यात आले आहे. तसेच भविष्यातही अशाच पद्धतीने ऐतिहासिक वास्तूंच्या जतनासाठी लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांनी समन्वयाने कार्य करण्याची अपेक्षाही व्यक्त करण्यात आली.सदर अभिनंदनीय ठराव पंचायत समिती सदस्य रूपाली बजरंग कुरळे यांनी सूचित केला असून धनंजय मधुकर लाड यांनी त्यास अनुमोदन दिले. त्यानंतर सभागृहाने हा ठराव सर्वानुमते मंजूर केला.

## लोकमाता अहिल्यादेवी होळकर समाजभूषण पुरस्काराने सुदाम ढेमरे सन्मानित

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** यशवंत सेना, अहिल्यानगर आणि जय मल्हार शैक्षणिक व बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत शाहु फुले आंबेडकर साठे कलाम सामाजीक विचार मंचाचे सुदाम साहेबराव ढेमरे यांना लोकमाता अहिल्यादेवी होळकर समाजभूषण पुरस्काराने गौरविण्यात आले.

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त आयोजित धनगर समाजाच्या मेळाव्यात ढेमरे यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. आमदार संग्राम जगताप यांची प्रमुख उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी प्राचार्य तुळशिराम भोजने, यशवंत सेनेचे शहराध्यक्ष कांतीलाल जाडकर, सरचिटणीस अजय जाडकर, शाहू, फुले, आंबेडकर, साठे, कलाम सामाजिक विचार मंचाचे संस्थापक अध्यक्ष अशोक शिंदे, जिल्हाध्यक्ष प्रदीप ससाणे, मच्छिंद्र बिडगर, शर्मिला नलावडे, सामाजिक कार्यकर्ते पै. नाना डोंगरे, पुणे महापालिकेच्या सहाय्यक आयुक्त रेश्मा पुणेकर, डॉ. सुनील सकट आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सुदाम ढेमरे शाहु फुले आंबेडकर साठे कलाम सामाजीक विचार मंचच्या माध्यमातून सामाजिक कार्य करत आहे. समाजातील उपेक्षित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी व विविध प्रकारे शासकीय लाभ मिळवून देण्यासाठी ते सातत्याने योगदान आहेत. त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन सदर पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले. पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## शिष्यवृत्ती परीक्षेत कार्मेल कॉन्व्हेंट हायस्कूलच्या साई शेटेची उल्लेखनीय कामगिरी

### महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या गुणवत्ता यादीत मानाचे स्थान

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेच्या गुणवत्ता यादीमध्ये कार्मेल कॉन्व्हेंट हायस्कूल, केडगाव येथील विद्यार्थी चि. साई संजय शेटे याने मानाचे स्थान मिळवून विद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. साईच्या या उल्लेखनीय यशामुळे शाळेसह पालक आणि परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्व स्तरातून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

साई शेटे याने सातत्यपूर्ण अभ्यास, जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. या यशामागे विद्यालयातील शिक्षकांचे प्रभावी मार्गदर्शन, अभ्यासातील नियमितता तसेच पालकांचे सातत्यपूर्ण प्रोत्साहन आणि सहकार्य यांचा मोठा वाटा असल्याची भावना व्यक्त करण्यात आली. साईच्या यशामुळे विद्यालयाच्या गुणवत्तापूर्ण शैक्षणिक परंपरेवर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले असून इतर विद्यार्थ्यांसाठीही त्याने प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सिस्टर दिव्या मारिया, वर्गशिक्षिका सौ. मनीषा तरटे तसेच विद्यालयातील सर्व शिक्षकांनी साईचे मनापासून अभिनंदन करून त्याच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. त्याचबरोबर शाळेतील विद्यार्थी, पालक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही त्याच्या यशाचे कौतुक करत उज्ज्वल भवितव्यासाठी शुभेच्छांचा वर्षाव केला. साई शेटेच्या या यशामुळे कार्मेल कॉन्व्हेंट हायस्कूल, केडगावच्या नावलौकिकात आणखी भर पडली असून विद्यालयासाठी हा अभिमानाचा क्षण ठरला आहे.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### अकोळनेर जिल्हा परिषद शाळेतील वाद चिघळला; शिक्षिकेची मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे धाव



अहिल्यानगर- अहिल्यानगर तालुक्यातील अकोळनेर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील अंतर्गत वाद आता जिल्हा परिषद प्रशासनापर्यंत पोहोचला असून, शिक्षिका सीमा हरिभाऊ गावडे यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे सविस्तर निवेदन देत प्रभारी मुख्याध्यापिका यांच्यावर मानसिक छळ, बदनामी, बदलीसाठी कटकारस्थान रचणे तसेच पूरक पोषण आहाराच्या वितरणात अनियमितता केल्याचे गंभीर आरोप केले आहेत. या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली आहे. निवेदनात सीमा गावडे यांनी म्हटले आहे की, त्या गेल्या दहा महिन्यांपासून अकोळनेर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत कार्यरत आहेत. अविवाहित, अनाथ व निराधार असल्याचा गैरफायदा घेत प्रभारी मुख्याध्यापिका त्यांना सातत्याने मानसिक त्रास देत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.त्यांच्या म्हणण्यानुसार, दर बुधवारी विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या पूरक पोषण आहाराचे १७ जून व २४ जून २०२६ रोजी वितरण झाले नसल्याबाबत त्यांनी मुख्याध्यापिकांना विचारणा केली. त्यानंतर मुख्याध्यापिकांनी सरपंचांच्या माध्यमातून आपल्याविरोधात वातावरण निर्माण करून बदलीसाठी कट रचल्याचा आरोप त्यांनी केला आहे.यावर्षी चौथीतील सुमारे ४० विद्यार्थी पाचवीत गेल्याने शाळेतील विद्यार्थीसंख्या कमी झाली असून, अतिरिक्त शिक्षक ठरण्याची शक्यता टाळण्यासाठी आपल्याला बदलीने हटविण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा दावा ही त्यांनी निवेदनात केला आहे. सीमा गावडे यांनी पुढे म्हटले आहे की, मुख्याध्यापिका वारंवार वर्गात येऊन विद्यार्थ्यांसमोर मोठ्या आवाजात वाद घालत होत्या. त्यामुळे आपला अपमान होत असून मानसिक छळ वाढला. यापूर्वी केंद्रप्रमुखांकडे तक्रार केल्यानंतर मुख्याध्यापिकांना तोंडी समज देण्यात आली होती, मात्र त्यानंतरही त्रास सुरूच राहिला असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

### दारूच्या नशेत शिवीगाळ, धमक्या; नागरिक त्रस्त, कारवाईची मागणी

अहिल्यानगर- सावेडी परिसरातील समता चौक येथे राहणाऱ्या एका महिलेने शेजाऱ्यांच्या कथित त्रासाविरोधात तोफखाना पोलीस ठाण्यात एनसी (अदखलपात्र तक्रार) दाखल केली असून संबंधितांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे. तक्रारदार पूनम चंगेडिया (रा. समता चौक, सिव्हिल हडको, सावेडी, अहिल्यानगर) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, शेजारी राहणारे योगेश उर्फ सुहास बाळासाहेब जगताप, विमल बाळासाहेब जगताप आणि संध्या योगेश जगताप यांच्याकडून वारंवार त्रास दिला जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे.तक्रारीत म्हटले आहे की, योगेश उर्फ सुहास जगताप हे अनेकदा मद्यधुंद अवस्थेत घरासमोर येऊन तक्रारदार तसेच परिसरातील नागरिकांना अश्लील शिवीगाळ करतात. तसेच ''बाहेर भेटा, तुम्हाला बघून घेतो'' अशा स्वरूपाच्या धमक्या देत असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. याशिवाय, घरातील महिला विमल जगताप व संध्या जगताप या खोटे गुन्हे दाखल करण्याची धमकी देत असल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकारामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचा दावा तक्रारदारांनी केला आहे. संबंधित कुटुंबाच्या वर्तनामुळे कॉलनीतील अनेक नागरिक त्रस्त असून, यापूर्वीही नागरिकांच्या स्वाक्षरीसह पोलीस अधीक्षकांकडे निवेदने देण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. मात्र, अद्याप संबंधितांवर कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याचा आरोप करत, कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी संबंधित व्यक्तींवर तातडीने योग्य ती कारवाई करण्यात यावी, अशी मागणी तक्रारदार पूनम चंगेडिया तसेच परिसरातील नागरिकांनी केली आहे.

# प्रभाग क्र. ९ मधील धोकादायक वीज यंत्रणा तातडीने दुरुस्त करा - रुपाली दातरंगे



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** प्रभाग क्र. ९ मधील विविध भागांमध्ये वाकलेले वीजखांब, तुटलेल्या व लोंबकळणाऱ्या वीजतारा, उघडे पडलेले डी.पी. (डिस्ट्रिब्युशन पॉइंट) तसेच वारंवार होणाऱ्या स्पार्किंगमुळे नागरिकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाला असून, पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर कोणतीही दुर्घटना घडू नये यासाठी नगरसेविका सौ. रुपाली दातरंगे यांनी संबंधित लोकप्रतिनिधींसह महावितरणच्या सहाय्यक अभियंत्यांना निवेदन देऊन तातडीने दुरुस्तीची मागणी केली आहे. दिल्लीगेट येथील महावितरण कार्यालयात हे निवेदन सादर करण्यात आले असून संपूर्ण प्रभागाची पाहणी करून आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात कल्याण रोड परिसर, गणेशनगर, दातरंगे मळा, बागरोजा, हडको, बालिकाश्रम रोड परिसर, वाघमळा, बडोदा बँक कॉलनी, भिमसेनपुरा, सिद्धार्थनगर, नीलक्रांती चौक आदी भागांमध्ये अनेक ठिकाणी वीजखांब धोकादायक अवस्थेत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. काही ठिकाणी दोन टेन्शन तारांमधील अंतर अत्यंत कमी असल्यामुळे वाऱ्यामुळे किंवा पावसात त्या एकमेकांना स्पर्श करून स्पार्किंग होत असल्याने तारा तुटण्याच्या घटना घडत आहेत. तसेच अनेक ठिकाणी डी.पी. उघडे पडल्याने नागरिकांसह लहान मुलांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

यावेळी नगरसेविका रुपाली दातरंगे म्हणाल्या, ''प्रभागातील नागरिकांच्या सुरक्षिततेपेक्षा महत्त्वाचे दुसरे कोणतेही काम नाही. गेल्या अनेक दिवसांपासून वीजखांब व वीजवाहिन्यांच्या धोकादायक स्थितीबाबत नागरिक सातत्याने तक्रारी करत आहेत. पावसाळ्यात या समस्या अधिक गंभीर बनतात. एखादी दुर्घटना घडल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा ती होऊच नये यासाठी महावितरणने तातडीने संपूर्ण प्रभागाची पाहणी करून वाकलेले खांब, तुटलेल्या तारा आणि उघडे डी.पी. दुरुस्त करणे अत्यावश्यक आहे. नागरिकांच्या जीविताशी संबंधित प्रश्नांमध्ये कोणतीही दिरंगाई सहन केली जाणार नाही.''

संदीप दातरंगे म्हणाल;म्हणाले कि ''लोकप्रतिनिधी म्हणून नागरिकांच्या प्रत्येक अडचणीबाबत प्रशासनाशी सातत्याने पाठपुरावा करणे ही आमची जबाबदारी आहे. प्रभागातील प्रत्येक भाग सुरक्षित व्हावा, नागरिकांना अखंड आणि सुरक्षित वीजपुरवठा मिळावा, तसेच भविष्यात कोणतीही दुर्घटना टाळण्यासाठी आवश्यक ती सर्व कामे तातडीने करण्यात यावीत, अशी आमची ठाम भूमिका आहे. प्रशासनाने या निवेदनाची गांभीर्याने दखल घेऊन त्वरित कार्यवाही करावी, अशी अपेक्षा आम्ही व्यक्त केली आहे.''

निवेदनात महावितरणने संपूर्ण प्रभागाची तांत्रिक पाहणी करून धोकादायक वीजखांब सरळ करणे, खराब व तुटलेल्या वीजवाहिन्या बदलणे, टेन्शन तारांमधील आवश्यक अंतर राखणे, उघडे असलेले डी.पी. सुरक्षित करणे तसेच भविष्यात अशा समस्या उद्भवू नयेत यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे. विशेषतः पावसाळ्यात विजेच्या यंत्रणेमुळे अपघात होण्याची शक्यता लक्षात घेता तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता निवेदनातून अधोरेखित करण्यात आली आहे.

या निवेदनावर नगरसेवक संजय शेंडगे, नगरसेविका वैशाली नळकांडे, नगरसेविका रुपाली दातरंगे, माजी नगरसेवक सचिन शिंदे तसेच सामाजिक कार्यकर्ते शुभम दातरंगे यांच्या स्वाक्षऱ्या असून, नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने ही संयुक्त मागणी करण्यात आली आहे. प्रभागातील वीज यंत्रणा सुरक्षित करण्यासाठी सर्व लोकप्रतिनिधींनी एकत्रितपणे पुढाकार घेतल्याचे यावेळी स्पष्ट झाले.

दरम्यान, प्रभागातील नागरिकांनीही महावितरणने या निवेदनाची तातडीने दखल घेऊन आवश्यक दुरुस्तीची कामे हाती घ्यावीत, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. पावसाळ्याच्या काळात वीज यंत्रणेतील त्रुटींमुळे होणाऱ्या संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी प्रशासनाने त्वरित उपाययोजना कराव्यात, अन्यथा नागरिकांच्या सुरक्षेच्या प्रश्नावर पुढील काळात तीव्र पाठपुरावा करण्यात येईल, असा इशाराही लोकप्रतिनिधींनी दिला आहे.



नगर शहराचे आमदार संग्राम जगताप व सहकार क्षेत्रात सलग ५४ वर्ष कार्यरत राहणेचा विश्वविक्रम करणारे नगर मर्चटस बँकेचे सर्वेसर्वा आदरणीय हस्तीमलजी मुनोत यांचे मार्गदर्शनाखाली बँकेचे जेष्ठ संचालक व सेवाभावी प्रामाणिक म्हणून नावलौकीक मिळवलेले संजय चोपडा यांनी संपुर्ण भारतात नावजलेल्या नगर मर्चटस् बँकेचे चेअरमनपदाचा कार्यभार स्विकारला.

# आर्य चाणक्यच्या विद्यार्थ्यांनी अनुभवली इस्त्रो सहल

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण–** भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई द्वारा संचलित आर्य चाणक्य विद्यामंदिर येथील मुलांनी भारत सरकारच्या इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन (इस्त्रो) च्या विज्ञान प्रसार व जनजागृती उपक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या ''लॅब ऑन व्हील्स / स्पेस ऑन व्हील्स इस्त्रो '' या विशेष उपक्रम अनुभवला.

या उपक्रमाअंतर्गत इयत्ता ५वी ते १०वीच्या विद्यार्थ्यांनी अंतराळ विज्ञान, रॉकेट विज्ञान, उपग्रह तंत्रज्ञान, अवकाश संशोधन आणि आधुनिक वैज्ञानिक संकल्पना यांचा प्रत्यक्ष अनुभव देण्यात आला. अत्याधुनिक उपकरणांनी सुसज्ज असलेली ''स्पेस ऑन व्हील्स व्हॅन '' चे विशेष आकर्षण व कुतूहल मुलांना होते. विद्यार्थ्यांना विविध वैज्ञानिक मॉडेल्स, प्रात्यक्षिके आणि दृकश्राव्य माध्यमातून अवकाश विज्ञानाची माहिती देण्यात आली.या प्रसंगी विविध शास्त्रज्ञानाच्या वेशभूषेत चिमुकल्यांनी सहभाग नोंदविला.

या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, संशोधनाची आवड, जिज्ञासा आणि नवोन्मेषी विचारसरणी विकसित करण्यासाठी ही सहल नक्कीच फायद्याची ठरणार आहे.

> **इस्त्रोच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना अंतराळ विज्ञानाची प्रत्यक्ष ओळख होऊन भविष्यात विज्ञान क्षेत्रात करिअर करण्याची प्रेरणा मिळणार आहे.**
> **-मनोज शिंगारे, (विज्ञान शिक्षक)**
> **आर्य चाणक्य विद्यामंदिर, पैठण**

या अनोख्या उपक्रमास डॉ.पद्मकुमार कासलीवाल( अध्यक्ष,आर्य चाणक्य शैक्षणिक संकुल), श्रीपाद कुलकर्णी( विज्ञान भारती देवगिरी विज्ञान प्रतिष्ठान), मनोज चव्हाण, (गटशिक्षणाधिकारी पं.स पैठण ),प्रा. धारूरकर, ॲड मयुरेश औटी, ज्ञानेश्वर वाडेकर, (केंद्रप्रमुख न. २), रेणुकादास गर्गे, रविंद्र साळजोशी,भास्कर कुलकर्णी.( केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा मुख्याध्यापक प्रा.वि.), ज्योती जोशी,( मुख्याध्यापक मा. वि. ) आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन विलास खर्डेकर आणि शिखा शाह यांनी केले.

# नाथांच्या पालखी प्रस्थान सोहळ्यास आमदार विलास भुमरे यांची उपस्थिती

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण–** शांतीब्रह्म श्री संत एकनाथ महाराजांच्या पवित्र पालखी प्रस्थान सोहळ्याला पैठण विधानसभा मतदारसंघाचे आमदार विलास पाटील भुमरे, नगराध्यक्ष भूषण कावसानकर आणि माजी नगराध्यक्ष दत्ता पाटील गोरडे यांनी उपस्थित राहून नाथ महाराजांचे दर्शन घेतले.

यावेळी मान्यवरांनी संत एकनाथ महाराजांच्या चरणी नतमस्तक होत राज्यातील जनतेला सुख, समृद्धी आणि आरोग्य लाभावे तसेच सर्वांवर नाथ महाराजांची कृपादृष्टी कायम राहावी, अशी प्रार्थना केली. पालखी प्रस्थान सोहळ्यादरम्यान वारकरी संप्रदायातील हरीभक्त वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. भक्तिमय वातावरणात टाळ–मृदंगाच्या गजरात आणि जयघोषात पालखीचे प्रस्थान झाले.

यावेळी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी विनय गौडा तसेच विविध विभागांतील प्रशासकीय अधिकारी यांच्याशी आमदार विलास भुमरे यांनी संवाद साधून पालखी सोहळ्याच्या नियोजनाचा आढावा घेतला. भाविकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने केलेल्या उपाययोजनांचीही त्यांनी माहिती घेतली.हेडलाईन : ''संत एकनाथ महाराजांच्या पालखी प्रस्थान सोहळ्यास आमदार विलास भुमरे यांची उपस्थिती; नाथ चरणी केली प्रार्थना'

# 'हरित कल्याण रोड' संकल्प मोहिमेचा शुभारंभ; ५०० वृक्षांच्या लागवड व संवर्धनाचा निर्धार

**शिवक्रांती प्रतिष्ठान व महापालिकेचा पर्यावरणपूरक उपक्रम; उपमहापौर धनंजय जाधव यांच्या हस्ते वृक्षारोपण**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** वाढते तापमान, कमी होत चाललेले हरित क्षेत्र आणि बदलत्या हवामानामुळे निर्माण होणाऱ्या पर्यावरणीय संकटावर मात करण्यासाठी श... क्रमांक १५ मध्ये शिवक्रांती प्र... अहिल्यानगर महानगरपालिके... विद्यमाने 'हरित कल्याण रोड ... मोहिमेचा' शुभारंभ उत्साह... आला. विद्या कॉलनी येथे उ... धनंजय जाधव यांच्या हस... करून या महत्त्वाकांक्षी अभिय... करण्यात आली.



या मोहिमेअंतर्गत परिसरात ५०० वृक्षांची लागवड करून त्यांचे दीर्घकालीन संवर्धन करण्याची जबाबदारी शिवक्रांती प्रतिष्ठान आणि नगरसेवक दत्ता गाडळकर यांनी स्वीकारली आहे. केवळ झाडे लावण्यापुरता हा उपक्रम मर्यादित न ठेवता प्रत्येक वृक्षाचे संगोपन, संरक्षण आणि नियमित देखभाल करण्यावर भर दिला जाणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

शुभारंभप्रसंगी माजी प्राचार्य ... यश देवकर, सुजित कर्डिले, हर्षल घुमरे, ऋषिकेश कर्डिले, अभिषेक दराडे, तेजस पवार, पियुष गुंडू, ऋषिकेश ढवळे, आकाश शेंडगे, जयदीप ठाणगे, सोमेश सोनवणे, नागेश पंधरकर, ऋषिकेश कांडेकर, ओम करांडे, ओंकार नजन, संकेत सोनवणे, स्वराज तोडकर, गौरव सुंबे, संकेत गुंड, सुमित पिसे, श्रेयस व्यवहारे, योगेश भापकर, पृथ्वीराज मिसाळ, जय कोरडे, श्लोक कोतकर, यश विधावे, उत्कर्ष साठे, वैभव साबळे, समद सय्यद, कपिल जुंद्रे यांच्यासह परिसरातील नागरिक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

उपमहापौर ॲड. धनंजय जाधव म्हणाले की, पर्यावरण संवर्धन ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे सामाजिक कर्तव्य आहे. आज वाढते तापमान, प्रदूषण आणि कमी होत चाललेले हरित क्षेत्र ही गंभीर चिंतेची बाब आहे. अशा परिस्थितीत प्रत्येकाने आपल्या आयुष्यात किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प केला पाहिजे. वृक्ष म्हणजे भविष्यातील पिढ्यांना दिलेली सर्वात मोठी भेट आहे.

# अहिल्यानगर जिल्ह्यात अपघात रोखण्यासाठी प्रशासन ॲक्शन मोडमध्ये

**शिवसेनेचे अभिजीत पोटे यांनी मांडलेल्या समस्यांवरही तातडीच्या कारवाईचे आदेश**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** अहिल्यानगर जिल्ह्यातील वाढत्या रस्ते अपघातांना आळा घालण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जिल्हा रस्ता सुरक्षा समितीच्या बैठकीत विविध महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. जिल्ह्यातील अपघात वळण ठिकाणे, अतिक्रमण, धोकादायक चौक, ब्लॅकस्पॉट, अपूर्ण सुरक्षा उपाययोजना तसेच राष्ट्रीय व राज्य महामार्गांवरील त्रुटी दूर करण्यासाठी संबंधित विभागांना तातडीने कार्यवाहीचे निर्देश देण्यात आले.

बैठकीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना नेते अभिजीत दादा पोटे यांनी जिल्ह्यातील रस्ता सुरक्षेशी संबंधित अनेक गंभीर प्रश्न उपस्थित केले. प्रवरा संगम परिसरातील अपघात वळण डिव्हायडर, रिफ्लेक्टर बोर्ड, झाडांच्या फांद्यांमुळे निर्माण होणारा धोका, टोल नाक्यांवरील वाहतूक कोंडी, पुणेअहिल्यानगर महामार्गावरील अतिक्रमण, बेकायदा पार्किंग, शहरातील वाहतूक कोंडी, पादचारी सुरक्षेचा प्रश्न, छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील धोकादायक ठिकाणे तसेच पुलांवरील सुरक्षेच्या उपाययोजनांची आवश्यकता याकडे प्रशासनाचे लक्ष वेधले.

अभिजीत दादा पोटे यांनी मांडलेल्या मुद्द्यांची गंभीर दखल घेत जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी संबंधित विभागांना तातडीने आवश्यक उपाययोजना करून निश्चित कालावधीत अहवाल सादर करण्याचे आदेश दिले.

बैठकीत एमआयडीसी येथील अपूर्ण फ्लायओव्हरचे काम पूर्ण करणे, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार रस्ता सुरक्षा उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी, राष्ट्रीय व राज्य महामार्गांवरील ब्लॅकस्पॉट दुरुस्त करणे, अतिक्रमण हटविणे, दिशादर्शक फलक, रिफ्लेक्टर, स्पीड ब्रेकर, झाडांच्या फांद्यांची छाटणी, विद्युत खांबांचे स्थलांतर तसेच बेकायदा पार्किंगवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले.

बैठकीस शिवसेनेचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब कदम, संजय वाघ अदीसह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी रस्ता सुरक्षेबाबत कोणतीही हयगय सहन केली जाणार नसून, प्रत्येक विभागाने जबाबदारीने काम करून निश्चित मुदतीत कार्यवाहीचा अहवाल सादर करावा, असे स्पष्ट निर्देश दिले. तसेच शिवसेना नेते अभिजीत दादा पोटे यांनी उपस्थित केलेल्या रस्ता सुरक्षेच्या प्रश्नांवर प्राधान्याने कार्यवाही करण्याचे आदेशही बैठकीत देण्यात आले.

# अंजनापूरात वृक्ष लागवड मोहिमेला १२ व्या वर्षी प्रारंभ

**वृक्षवेध फाउंडेशनकडून महत्वाचे आवाहन**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**कोपरगाव–** कोपरगाव तालुक्यातील अंजनापूर येथे वृक्ष वेध फाउंडेशनच्या वतीने ५ जुलै ते ९ जुलै या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या प्रकृती वंदन २१०० आशीर्वाद वृक्ष लागवड मोहिमेला रविवारी दि. ५ जुलै पासून उत्साहात प्रारंभ झाला. अंजनापूर येथील हनुमान मंदिर परिसरात ज्येष्ठ नागरिक व ग्रामस्थांच्या हस्ते नारळ फोडून वृक्षारोपण करून मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला.

पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारी ही वृक्ष लागवड मोहीम गेल्या १२ वर्षांपासून सातत्याने राबविण्यात येत असून आत्तापर्यंत १६ हजारांपेक्षा अधिक वृक्ष लागवड आणि संवर्धन करण्यात आले आहे. बारा वर्षांपूर्वी बाबासाहेब गव्हाणे यांच्या संकल्पनेतून वृक्षवेत फाउंडेशनच्या माध्यमातून आणि गावातील ग्रामस्थांच्या सहकार्य आणि परिश्रमाने सुरू झालेल्या या उपक्रमाचे आज वटवृक्षात रूपांतर झाल्याचे पाहायला मिळत आहे. दरवर्षी गावातील नागरिक, युवक आणि विविध सामाजिक घटकांच्या सहभागामुळे या मोहिमेला मोठा प्रतिसाद मिळत आहे. यावेळी उपस्थितांनी पर्यावरण संरक्षणासाठी प्रत्येकाने किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प व्यक्त केला.५ ते ९ जुलैदरम्यान गावातील विविध ठिकाणी वृक्षारोपण करण्यात येणार असून, अधिकाधिक नागरिकांनी या पर्यावरणपूरक मोहिमेत सहभागी व्हावे तसेच अंजनापूरच्या धर्तीवर इतर गावांतील युवकांनीही अशा उपक्रमात सहभागी होऊन वृक्ष लागवड व संवर्धनासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन वृक्षवेध फाउंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे. तसेच आपल्या गावात आपल्याला वृक्षारोपण मोहीम राबवायची असेल तर वृक्षवेत फाउंडेशन आपल्याला झाडे उपलब्ध करून देणार असल्याची माहिती फाउंडेशनचे संस्थापक बाबासाहेब गव्हाणे यांनी दिली असून अधिक माहितीसाठी ९८२५११७९०५ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

# ॲड. अच्युतराव पिंगळे यांना जनलोक हितवादी ॲडव्होकेट जीवन गौरव सन्मानाचा प्रस्ताव

**वकिलांच्या वतीने होणार गौरव । नगर अर्बन बँक भ्रष्टाचारविरोधी १६ वर्षांच्या विनामोबदला लढ्याचा सन्मान**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेतील मोठ्या प्रमाणावरील भ्रष्टाचाराविरोधात ठेवीदारांच्या हितासाठी तब्बल १६ वर्षे सातत्याने धाडसाने आणि विनामोबदला कायदेशीर लढा देणारे ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. अच्युतराव पिंगळे यांचा ''न्याय वंदना कार्यक्रम'' अंतर्गत ''जनलोक हितवादी ॲडव्होकेट जीवन गौरव'' या विशेष सन्मानाने गौरव करण्याचा पुढाकार महाराष्ट्रातील विधिज्ञ बांधवांच्या वतीने घेण्यात आला आहे.




या उपक्रमासाठी पीपल्स हेल्पलाईनचे अध्यक्ष ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. कारभारी गवळी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी पुढाकार घेतला आहे. ॲड. अच्युतराव पिंगळे यांनी नगर अर्बन बँकेच्या ठेवीदारांसाठी केलेले काम हे वकिली व्यवसायातील लोकहितवादी परंपरेचे उज्ज्वल उदाहरण असल्याचे ॲड. गवळी यांनी म्हटले आहे.

नगर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या अहमदनगर, जालना आणि पुणे जिल्ह्यांत एकूण ४७ शाखा होत्या. बँकेतील कथित भ्रष्टाचार आणि गैरव्यवहारांमुळे बँक लिक्विडेशनमध्ये गेली. या प्रक्रियेमुळे हजारो ठेवीदारांचे कष्टाचे पैसे अडकले. दिवंगत खासदार दिलीप गांधी हे या बँकेचे दशकाहून अधिक काळ अध्यक्ष राहिले होते. त्यांच्या कार्यकाळात बँकेच्या आर्थिक व्यवस्थापनावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले, असे ठेवीदार आणि जनहित कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे.

या पार्श्वभूमीवर ॲड. अच्युतराव पिंगळे यांनी ठेवीदारांच्या बाजूने सातत्याने कायदेशीर लढा उभारला. अनेक कायदेशीर अडथळे, प्रशासकीय गुंतागुंत आणि दीर्घकालीन संघर्ष असतानाही त्यांनी कोणतेही मानधन न घेता ही जबाबदारी पार पाडली. त्यांच्या या लोकहितवादी प्रयत्नांमुळे ठेवीदारांना आतापर्यंत सुमारे ८० टक्के रक्कम परत मिळाल्याचे सांगण्यात आले आहे.

ॲड. कारभारी गवळी म्हणाले की, ''वकिली व्यवसाय केवळ मानधनावर चालणारा व्यवसाय नाही, तर तो समाजन्यायाचा जिवंत आधारस्तंभ आहे. स्वातंत्र्यलढ्यात अनेक वकिलांनी देशासाठी आपले ज्ञान, वेळ आणि आयुष्य अर्पण केले. त्याच परंपरेचा वारसा ॲड. अच्युतराव पिंगळे यांनी नगर अर्बन बँकेच्या ठेवीदारांसाठी उभा केला आहे. म्हणूनच त्यांना 'जनलोक हितवादी ॲडव्होकेट जीवन गौरव' देणे ही महाराष्ट्रातील विधिज्ञ बांधवांची कृतज्ञता आहे.''

या सन्मानामागील उद्देश केवळ एका व्यक्तीचा गौरव करणे नसून, वकिली व्यवसायात सार्वजनिक कारणांसाठी नि:स्वार्थपणे काम करण्याची प्रेरणा निर्माण करणे हा आहे. भ्रष्टाचार, आर्थिक अन्याय, ठेवीदारांचे हक्क, ग्राहक संरक्षण आणि सार्वजनिक संस्थांची पारदर्शकता या प्रश्नांवर वकील बांधवांनी अधिक सक्रिय भूमिका घ्यावी, असा संदेश या न्याय वंदना कार्यक्रमातून दिला जाणार आहे.

दरम्यान, ॲड. अच्युतराव पिंगळे यांनी नगर अर्बन बँक पुन्हा सुरू करण्यासाठी पुढाकार घेण्याची घोषणा केली आहे. पारदर्शकता, ठेवीदारांचा विश्वास आणि लोकहितवादी आर्थिक शिस्त या आधारांवर बँकेचे पुनरुज्जीवन करण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला आहे. ''जनलोक हितवादी ॲडव्होकेट जीवन गौरव'' हा सन्मान नगर अर्बन बँकेतील भ्रष्टाचारविरोधी लढ्याचा, ठेवीदारांच्या न्यायहक्कांचा आणि विनामोबदला जनहितासाठी कार्य करणाऱ्या वकिली परंपरेचा सन्मान आहे. महाराष्ट्रातील विधिज्ञ बांधवांनी या उपक्रमाला सहकार्य करावे आणि सार्वजनिक न्यायाच्या कार्यात पुढाकार घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. या सन्मानासाठी अहमदनगर बार असोसिएशनने पाठिंबा दिला असून, यासाठी अध्यक्ष ॲड. कृष्णा झावरे, ॲड. भाऊसाहेब घुले, सचिव ॲड. विनोद शेटे, ॲड. आनंद सूर्यवंशी, ॲड. अमोल अकोलकर, ॲड. सारिका झरेकर, ॲड. वसीम खान, ॲड. प्राजक्ता करांडे, ॲड. आजिनाथ कर्डिले, ॲड. महेश कोतकर, ॲड. प्रमोद खामकर, ॲड. ज्ञानदेव दाते, ॲड. अक्षय म्हस्के, ॲड. शिवाजी शिंदे आदी प्रयत्नशील आहेत.

# विठ्ठल-रुक्मिणी मंदिरामुळे परिसराला मिळाली नवी आध्यात्मिक ओळख - आ. संग्राम जगताप

**केडगाव होणार प्रतिपंढरपूर । विठ्ठल-रुक्मिणी मंदिराचा मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा धार्मिक वातावरणात संपन्न**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** केडगाव देवी परिसरातील धनश्री कॉलनी-चिपाडे मळा येथे संत सावता महाराज तसेच श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिराच्या मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा धार्मिक वातावरणात मोठ्या उत्साहात पार पडला. या सोहळ्यास आमदार संग्राम जगताप यांनी उपस्थित राहून भाविकांना शुभेच्छा दिल्या. परिसरातील नागरिकांच्या सहभागामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय बनला होता.

यावेळी आमदार संग्राम जगताप म्हणाले की, विठ्ठल-रुक्मिणी मंदिर म्हणजे श्रद्धा, संस्कार आणि समाज एकत्र आणणारे केंद्र आहे. या मंदिरामुळे केडगाव परिसराला नवी आध्यात्मिक ओळख मिळाली असून भविष्यात हा भाग 'प्रति पंढरपूर' म्हणून ओळखला जाईल. नागरिकांनी एकोप्याने उभारलेले हे मंदिर समाजातील ऐक्य आणि भक्तीचे प्रतीक आहे. धार्मिक आणि सामाजिक उपक्रमांना माझे कायम सहकार्य राहील. मंदिर परिसराचा विकास, भाविकांसाठी आवश्यक सुविधा आणि परिसरातील विकासकामांसाठीही आपण कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. नगरसेविका अश्विनी लोंढे म्हणाल्या की, केडगाव देवी मंदिर ते चिपाडे मळा भव्य दिंडी, पालखी मिरवणूक काढून भजन-कीर्तन व विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये महिलांसह, युवक-युवती, ज्येष्ठ नागरिक आणि बालकांनीही मोठ्या उत्साहाने सहभाग घेतल्याने संपूर्ण परिसर विठ्ठल नामाच्या गजराने दुमदुमून गेला. धार्मिक सोहळ्याने जीवनात ऊर्जा मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी नगरसेवक मनोज कोतकर म्हणाले, श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात मुर्तींची स्थापना हा ऐतिहासिक क्षण आहे. या भागात विठ्ठल-रुक्मिणीचे मंदिर नसल्याची खंत आज दूर झाली आहे. परिसरातील नागरिकांनी स्वखर्चातून हे सुंदर मंदिर उभारले आहे. हा आदर्श समाजासाठी प्रेरणादायी असून या सर्व नागरिकांचे मनःपूर्वक त्यांनी अभिनंदन केले. प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. येत्या २५ जुलै रोजी मंदिरात भव्य धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. यावेळी नगरसेवक मयूर बांगरे, उद्योजक सुमित लोंढे, उद्योजक जालिंदर कोतकर, संभाजी पवार, विजय सूंबे आदीसह परिसरातील सर्व नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

# गरजवंत विद्यार्थ्यांना पुस्तक संचांचे वाटप; शिक्षणासाठीची मदत हीच खरी समाजसेवा - सुमतीलाल कोठारी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** विद्यार्थ्यांना योग्य वेळी शैक्षणिक साहित्याची मदत करणे हे समाजोपयोगी आणि प्रेरणादायी कार्य असून ज्ञानदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. शिक्षणाच्या बळावरच सुसंस्कृत आणि सक्षम भारताची निर्मिती होऊ शकते, असे प्रतिपादन हिंद सेवा मंडळाचे कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी यांनी केले.

हिंद सेवा मंडळाच्या सीताराम सारडा विद्यालयात इयत्ता नववीतील गरजवंत विद्यार्थ्यांना नगरसेवक सागर मुर्तडकर यांच्या वतीने नववीच्या पुस्तकांचे संपूर्ण संच प्रदान करण्यात आले. यावेळी कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी, विद्यालयाचे चेअरमन अजित बोरा, मेहेर इंग्लिश स्कूलचे चेअरमन झालानी, मुख्याध्यापक अशोक डोळसे, शिक्षिका प्रतिनिधी सौ. निमा राहींज यांच्यासह शिक्षक, पालक, माजी विद्यार्थी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




अध्यक्षीय भाषणात सुमतीलाल कोठारी म्हणाले की, गरजवंत विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून देणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. अशा मदतीमुळे विद्यार्थ्यांना शिक्षणाची प्रेरणा मिळते आणि ते आपल्या कुटुंबासह शाळेचे नाव उज्ज्वल करतात. हिंद सेवा मंडळ ही संस्था समाजातील सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्याबरोबरच त्यांना आवश्यक ते सहकार्य करण्यासाठी कायम कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

चेअरमन अजित बोरा यांनी शिक्षणासारख्या पवित्र कार्यासाठी दिलेले सहकार्य अत्यंत मोलाचे असून अशा उपक्रमांमुळे अनेक विद्यार्थ्यांच्या आयुष्याला नवी दिशा मिळते, असे सांगितले.

नगरसेवक सागर मुर्तडकर यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, शिक्षण ही काळाची गरज असून गेल्या आठ ते दहा वर्षांपासून बालवाडीपासून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपर्यंत आपल्या क्षमतेनुसार शैक्षणिक मदत करण्याचा प्रयत्न सातत्याने सुरू आहे. हिंद सेवा मंडळ ही सर्वसामान्यांच्या मुलांना प्रामाणिकपणे शिक्षण देणारी संस्था असून सीताराम सारडा विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी काही करता आल्याचा मनापासून आनंद होत असल्याचे त्यांनी नमूद केले. भविष्यातही विद्यालयाच्या प्रत्येक विधायक उपक्रमात सहभागी होण्याची ग्वाही त्यांनी दिली.

यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना नववीच्या पुस्तकांचे संच वितरित करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी मुख्याध्यापक अशोक डोळसे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. पुस्तक पेढीच्या प्रमुख श्रीमती क्रांती मुंदानकर यांनी सूत्रसंचालन, मान्यवरांचा परिचय आणि सन्मान केला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गणेश नागपुरे, ज्येष्ठ शिक्षक रवींद्र चोभे, वृषाली जोशी, संजय शेकडे आदींनी विशेष सहकार्य केले.

(पान १ वरून)

## देहरे येथे भाजीविक्रेत्या महिलेला लुटणारे दोघे सराईत अटकेत

दाखवताच त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली.

आरोपींकडून गुन्ह्यात वापरलेली ३० हजार रुपये किमतीची दुचाकी आणि १० हजार रुपये किमतीचा मोबाईल असा एकूण ४० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपासासाठी आरोपींना एमआयडीसी पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

## मध्यरात्री पुन्हा अपघात; आज पर्यंतच्या अपघाताची संख्या बारावर

अपघात घडले आहेत. सुदैवाने या अपघातामध्ये मनुष्यहानी झाली नसली तरी वाहनांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे.

यासंदर्भात दिल्लीगेट येथील व्यावसायिक आणि नागरिकांनी उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्याकडे तक्रार केली. या तक्रारीची तात्काळ दखल घेत उपमहापौर जाधव यांनी या रस्ता दुभाजकाच्या बाबत महानगरपालिकेचे अभियंता निंबाळकर यांना तातडीने बोलावून घेत, रस्ता दुभाजकाच्या दोन्ही बाजूंनी रेडियम लावलेले मोठे पाईप तसेच रस्ता दुभाजकावर काळे पिवळे रंगाचे पट्टे मारले होते. वाहन चालकांना रात्रीच्या वेळी दुभाजक दिसून यावा म्हणून लाईटची व्यवस्था सुद्धा केली होती. असे असताना सुद्धा या दुभाजकावर धडकून वाहन चालकांचे होणारे अपघात थांबलेले नाहीत. त्यामुळे आता या दुभाजकाला दिल्लीगेट परिसरातील नागरिक शापित दुभाजक असे म्हणतात.

## अहिल्यानगरातील हॉटेल सगम आणि सत्कारचा परवाना निलंबित

प्रशासनाने जारी केले आहेत. प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, परवाना निलंबित असताना संबंधित हॉटेलांनी कोणत्याही प्रकारचा अन्न व्यवसाय चालवू नये. आदेशाचे उल्लंघन करून व्यवसाय सुरू ठेवल्यास अन्न सुरक्षा व मानके कायद्यानुसार कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही प्रशासनाने दिला आहे. दरम्यान, या आदेशाविरोधात संबंधित हॉटेल चालकांना नियमानुसार अन्न सुरक्षा आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, मुंबई यांच्याकडे अपील करण्याचा अधिकार उपलब्ध आहे.अन्न व औषध प्रशासनाने 'सुरक्षित अन्न, निरोगी महाराष्ट्र' मोहिमेअंतर्गत पुढील काळातही जिल्हाभरातील हॉटेल, रेस्टॉरंट, बेकरी, मिठाई दुकाने आणि इतर अन्न व्यवसायांची तपासणी अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे संकेत दिले आहेत. त्यामुळे अन्न व्यवसायिकांनी स्वच्छता आणि अन्न सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन करावे, अन्यथा अशाच प्रकारची कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही प्रशासनाकडून देण्यात आला आहे

## राज्यातील प्राथमिक आणि माध्यमिक शाळा सकाळी भरणार

नसलेल्या शिक्षकांनी बीएलओ म्हणून नियुक्त केलेल्या शिक्षकांच्या कामात सहाय्य करावे, जेणेकरून शिक्षकांवर अतिरिक्त ताण येणार नाही, असे नमूद करण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर, बीएलओ असलेल्या शिक्षकांना मतदारयाद्यांचे काम करण्यास वेळ मिळण्यासाठी थेट राज्यातील शाळांचीच वेळ बदलण्यात येणार आहे.

## कीर्तनवाडी दरोडा प्रकरणातील दोन आरोपी एलसीबीकडून जेरबंद

कीर्तने आणि त्यांच्या पत्नीला अज्ञात आठ-दहा चोरट्यांनी मारहाण करून, त्यांच्या व साक्षीदारांच्या घरातून एकूण ४ लाख ७० हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल बळजबरीने चोरून नेला होता. याप्रकरणी पाथर्डी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३१०(२) अन्वये दरोड्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

एलसीबीचे पथक या गुन्ह्याचा तपास करत असताना ७ जुलै रोजी गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीवरून, टाकळीमानूर शिवारातून राम कृष्णा चव्हाण (वय २२, रा. गेवराई, बीड) आणि करण रामनाथ भोसले (वय २०, रा. सारोळा कासार, अहिल्यानगर) या दोघांना ताब्यात घेण्यात आले. आरोपींनी इतर ७ फरार साथीदार राहुल काळे, आदिशोक चव्हाण, हनुमान चव्हाण, लक्ष्मण चव्हाण, सागर चव्हाण, कडुबा ढोणे, विकास भोसले यांच्या मदतीने हा गुन्हा केल्याची कबुली दिली. तसेच चोरीचे दागिने विकत घेणारा सराफ ओमकार पांडुरंग दहिवाळ (रा. चकलांबा) यालाही पोलिसांनी निष्पन्न केले आहे.

चौकशीत आरोपींकडून पाथर्डी आणि शेवगाव पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील घरफोडी व जबरी चोरीचे इतर ११ गुन्हे उघडकीस आले आहेत. ताब्यात घेतलेल्या तिन्ही आरोपींना पुढील तपासासाठी पाथर्डी पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

## नगरकरांना भावली...बबन्या, माय व जानरावची धमाल

समूहाचे प्रमुख राजेंद्र पाचे, आदींच्या सहकार्याने झालेला हा प्रयोग नगरकर रसिकांनी टाळ्यांच्या गजरात हाऊसफुल्ल गौरवला.

वऱ्हाड निघालंय लंडनला या नाटकात प्रा. देशपांडे यांनी एकट्याने सादर केलेली सर्वच्या सर्व ५२ पात्रे बहुपात्री करताना १६ महिलांनीच उभी केली होती. या प्रयोगातील सर्व महिला उच्चशिक्षित आणि प्रतिष्ठित संस्थांमध्ये उच्चपदस्थ आहेत. अबोली जोशी-पोतनीस (बबन्या), अपर्णा सरनोबत (बाप्पा), रेवती वेखंडे (माय), अदिती मांद्रेकर (जानराव), शुभांगी पांगरीकर (नारायणराव आणि ज्युडी), अनघा धोपाटे (वेंधळी मंदी) प्रियांका जोशी (शास्त्रीबुवा), तनया कोदे (बिनकामाच्या वन्स), ज्युडीची आई आणि दिग्दर्शक श्रुती धानोरकर, गौरी रोडे (काशिनाथ) व सूत्रधार सुकृत सरनोबत यांनी नाटकाचे सादरीकरण झकास केले. बबन्याचं मोडकंतोडकं इंग्रजी, जानरावचा ब्रिटीश लहेजा, मायचं लचकणं-मुरडणं, मंदीचा वेंधळेपणा, बिनकामाच्या वन्संचा तोरा तसेच बुंगमध्ये (विमान) बसण्याची धमाल,तेथील सिक्युरिटी चेकिंग, विमानातील फुकटच्या चॉकलेट-बिस्किटावर तुटून पडलेली पोरंसोरं...सारं नाट्य नगरकर रसिकांना खळखळून हसवून गेलं. क्लोथ क्लोथ बस्ता...होल वावर इज अवर...असे नाटकातील प्रसिद्ध डायलॉग दाद मिळवून गेले.रेडिओनगर आरजे कोमल हिने स्वागत केले. सुहासभाई मुळे यांनी प्रास्ताविकात कलाकार कट्ट्याची संकल्पना उत्कृष्ट कवितेच्या रूपात मांडली. वऱ्हाडची बहुपात्री रचना हा नवा प्रयोग असल्याने तसेच यातील काही हौशी महिला कलावंत अहिल्यानगरच्या असल्याने त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळण्यासाठी या प्रयोगाचे आयोजन केल्याचे त्यांनी सांगितले. नगरकर रसिकांनी या आगळ्यावेगळ्या सादरीकरणाला दाद दिल्याबद्दल आभारही मानले.

आ. जगतापांकडून कौतुक

या प्रयोगानंतर आमदार संग्राम जगताप यांनीही आवर्जून सर्व कलावंतांची भेट घेऊन त्यांचे कौतुक केले. नगरमध्ये पुन्हा एकदा हा प्रयोग करण्यास स्वतः पुढाकार घेण्याची ग्वाहीही दिली. यावेळी नगरसेवक निखील वारे, डॉ. सागर बोरुडे, महेश लोंढे तसेच नाटकाचे ध्वनी संयोजक राजू ढोरे आदी उपस्थित होते.

## पर्यावरणाच्या रक्षणासाठी वृक्षारोपण व संवर्धन ही काळाची गरज – उपमहापौर ॲड. धनंजय जाधव

की, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी ग्रीन सिटी मोहिमेच्या माध्यमातून समाजामध्ये वृक्षांचे महत्त्व आणि पर्यावरणाचा समतोल राखण्याचा जो संदेश दिला आहे, तो अत्यंत कौतुकास्पद आहे. सारडा कॉलेजने वृक्षारोपणाबरोबरच वृक्षसंवर्धनाची जबाबदारी स्वीकारली असून विद्यार्थ्यांमध्येही पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण केली जात आहे. वृक्षारोपण ही केवळ एका व्यक्तीची नव्हे, तर संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. प्रत्येकाने आपल्या आयुष्यात किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प करावा.

यावेळी ज्येष्ठ मार्गदर्शक ब्रिजलाल सारडा यांनीही उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्या ग्रीन सिटी मोहिमेचे मनापासून कौतुक केले. स्वर्गीय कृष्णाभाऊ जाधव यांनी समाजसेवा आणि पर्यावरण संवर्धनाची जी परंपरा निर्माण केली, तोच प्रेरणादायी वारसा धनंजय जाधव समर्थपणे पुढे नेत आहेत. समाजहिताच्या अशा उपक्रमांमुळे नव्या पिढीमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण होत असून याचा आम्हा सर्वांना अभिमान आहे, असे ते म्हणाले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रसाद बेडेकर यांनी केले. उपस्थित मान्यवर, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने वृक्षारोपण करत पर्यावरण संरक्षणाचा सामूहिक संकल्प केला.

## जन्मदशा

तुमचा मुलगा अंग काठीने वाढला,
असा निरोप शाळा मास्तरांनी घरी धाडला, आईबाप आमचे
अडाणी, गावात फक्त मास्तरची टाळकीच शहाणी,
जरी संपले नाही बालपणाचे वय,
मास्तरने केली नाही आमची गय,
मास्तरच अख्ख्या गावात ज्ञानी,
ऐका आमच्या जन्मतारखेची कहानी, मास्तरांनीच पोरांची
जन्म तिथी काढली,
सर्वांना जन्माची तारीख १ जूनच वाढली,
आम्ही सर्व विद्यार्थी एकाच दिवशी जन्माला आलो,
आणि वय भाऊ म्हणूनआनंदाने धन्य झालो,
सोयरीकिला सासरचे विचारायचे फक्त आमचे जन्म वर्ष,
त्यामुळे मनात व्हायचा वेगळाच हर्ष,
आमच्या जन्मतारखेने केला असा उत्कर्ष,
लोक म्हणायचे असं कसं साला ? हा काय चमत्कार झाला ?
अख्खा वर्ग एकाच दिवशी जन्माला कसा आला ?,
वाढदिवसाचा केक थोडा सुद्धा नाही उरला,
अख्या वर्गाला एकच केक पुरला,
मोठे झाल्यावर जन्माच्या तारखेने आमचे उडाले होश,
परंतु यात आमचा काहीच नाही दोष,
तरी आमच्यावर नियतीचा रोष,
तारखेच्या घोटाळ्याने आम्ही सम जन्मी मारतोत सरकारी
कार्यालयात चकरा ,
जन्म तारखेच्या पश्चातापाने मारतो भिंतीला टकरा,
चकरा मारल्याने गळतात अंगातून घामाच्या धारा, पण
सरकारच्या नजरेत आम्हाला नाही अजिबात थारा,
सत्रा मागून जातात सत्र, मिळत नाही आम्हाला शासकीय
जन्म प्रमाणपत्र,
थकून थकून जन्म बंधू शासकीय कार्यालयाचे पायऱ्यावर
बसतात,
आणि कार्यालयातील लोक आमच्याकडे पाहून
मिश्किलपणे हसतात, जन्माच्या त्रासाने उडवली आमची
भूक,
तुम्ही सांगा मित्रांनो यात काय आमची चूक ?,
जरी आमची जन्मतारीख असली फेक,
तरी विकतात त्या दिवशी अख्ख्या महाराष्ट्रातील सर्व
बेकऱ्यांचे केक,
ही आमच्या जन्माची दशा,
चूक नसताना आम्ही मारतो ऊठ बश्या ,

**कवी रऊफ समद शेख,**
सेवानिवृत्त पी.एस.आय.,
मोबाईल नंबर ९८ २२ ९० ७८ ६९